आजचे कार्यक्रम

* आरोग्यशाळा रुग्णालयात शल्यतंत्र विभागात भगंदर विकारांसाठी शिबिर, वेळ सकाळी ९:३० ते ४:३०,आरोग्यशाला रुग्णालय.

* 'पुस्तकावर बोलू काही' कार्यक्रमात हुतात्मा स्मारकात सायंकाळी पाचला विनया काकडे 'माझी या मना' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

* जाणीव सांस्कृतिक अभियानतर्फे सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन. त्याअंतर्गत दि. १५ व १६ रोजी एकल व युगलगीतांची प्रथम ऑडिशन फेरी ए एन कराओके क्लब, ट्रायडंट, आर.डी चौक, नाशिक येथे सकाळी ९ ते ५.

श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ पारायणाची सांगता

नाशिक । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रधान केंद्र दिंडोरी आणि श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वरसह देशभरातील व देशाबाहेरील केंद्रांवर झालेल्या श्रीगुरुपौर्णिमा सोहळ्याची सांगता काल झाली. सांगता सोहळ्यास एक हजार आठशे सेवेकऱ्यांनी हजेरी लावली.

आषाढी एकादशीपासून सुरू झालेल्या या गुरुपौर्णिमा सोहळ्यात दिंडोरी दरबार व त्र्यंबकेश्वर गुरुपीठात जवळपास आठ लाखाहून अधिक आबालवृद्ध सेवेकऱ्यांनी येऊन गुरुमाऊली व श्री स्वामी समर्थ महाराजांचे आशीर्वाद व दर्शन घेतले. गेल्या सात दिवसात देशभरातून आलेल्या प्रमुख हजारो सेवेकऱ्यांना गुरुमाऊलींनी पुढील कार्याबाबत व घरो-घरी सेवाकार्य पोहोचविण्यासाठी काय दिशा ञअसावी, याबाबत मार्गदर्शन केले.

हा सोहळा गोवा,गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, जम्मू, उत्तर प्रदेश, तेलंगना, तामिळनाडू, केरळ यासह अनेक राज्यात आणि नेपाळ, अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, युरोप, ऑस्ट्रेलिया, दुबई,ओमानमधील समर्थ केंद्रात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पारायणाची अखंडित सेवा चंद्रकांत मोरे, श्री स्वामी समर्थ गुरुपीठात दर शनिवारी एकदिवसीय श्रीगुरुचरित्र, महिन्यातून एकदा नवनाथ,

एकदा भैरवचंडी करण्याची सुवर्णसंधी भाविकांना गेल्या अनेक वर्षांपासून उपलब्ध करून दिली असून, आतापर्यंत लाखोंनी सेवेची पर्वणी साधली आहे. अशी माहिती यानिमित्त चंद्रकांत मोरे यांनी दिली.

'नावा'चे वार्षिक स्नेहसंमेलन

नाशिक । नाशिक ॲडव्हर्टायझिंग एजन्सीज् वेल्फेअर असोसिएशन (नावा) चे स्नेहसंमेलन गंगापूर धरणाजवळील एअर स्टुडिओ रिसॉर्टमध्ये झाले. नावा सदस्यांच्या कुंटुंबीयांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी माजी अध्यक्षांचा यावेळी सत्कार करण्यात आला. अध्यक्ष प्रवीण चांडक, उपाध्यक्ष

गणेश नाफडे, फेमचे अध्यक्ष रवी पवार, नावाचे माजी अध्यक्ष मोतीराम पिंगळे, विठ्ठल देशपांडे, विठ्ठल राजोळे, खजिनदार अमोल कुलकर्णी, प्रसिद्धीप्रमुख दिलीप निकम, सरचिटणीस दीपक जगताप, सभासद सतीश जोशी, अभिजीत चांदे, किरण पाटील, प्रवीण मराठे, अनिल अग्निहोत्री, किशोर खैरनार, महेश कलंत्री, नितीन शेवाळे, कैलास खैरे, श्याम पवार, आदी उपस्थित होते.

इनरव्हीलचे पदग्रहण

नाशिक । इनरव्हील क्लबचा पदग्रहण सोहळा रोटरी हॉल, गंजमाळ येथे झाला. नूतन अध्यक्षा लीला भंडारी यांनी मावळत्या अध्यक्षा प्रज्ञा गोखले यांच्याकडून स्वीकारला. उपाध्यक्ष अलका फटांगरे, सेक्रेटरी सुनीता सोनवणे, खजिनदार कल्पना महाजन, आयएसओ स्नेहा पुली, एडिटर कल्पना माळोदे यांनी पदभार स्वीकारला. प्रमुख अतिथी म्हणून रमा गर्ग उपस्थित होत्या.

शिवसेना डॉक्टर सेल महानगरप्रमुखपदी डॉ. देवरे

नाशिक । येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. गौरव देवरे यांची शिवसेना नाशिक जिल्हा महानगरप्रमुख (डॉक्टर सेल) या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नुकतेच या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष (डॉक्टर सेल) डॉ. धनंजय पडवळ महाराष्ट्र राज्य यांच्याकडून त्यांना पत्र प्राप्त झाले आहे.

न्युबा, नामको बँकेचा प्रशिक्षण कार्यक्रम

नाशिक । दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन मर्यादित व दि नासिक मर्चन्टस् को-ऑप बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने नामको बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.

जिल्ह्यातील न्युबाच्या सभासद सहकारी संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक आदींसाठी 'व्यावसायिक शाश्वततेसाठी मानवी भांडवल कामगिरी मोजमाप' या विषयावर ठाणे जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नामको बँक अध्यक्ष हेमंत धात्रक, न्युबा अध्यक्ष पोपट सुराणा, संचालक दत्ता गायकवाड, अजय ब्रम्हेचा, वसंत खैरनार, नानासाहेब सोनवणे, नामको बँक उपाध्यक्ष सुभाष नहार, ज्येष्ठ संचालक सोहनलाल भंडारी, विजय साने उपस्थित होते.

विद्यार्थी गुणगौरव...

एम. एस. कोठारी अकॅडमी व कनिष्ठ महाविद्यालयात दहावी, बारावी, शिष्यवृत्ती व एम.टी.एस. परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षक.

शैक्षणिक मदतीसाठी अर्ज करा

नाशिक । उंटविडी विक्रेता सत्कार्य निधी यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पान दुकानदार व विडी विक्रेत्यांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

या योजनेचा उद्देश गरजू कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये. यासाठी आर्थिक मदत करणे हा आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज निर्धारित नमुन्यात भरून पाठवावेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० ऑगस्ट आहे. तरी गरजू पालक व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उंटविडी विक्रेता सत्कार्य निधीच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी सोमनाथ आहेर मोबा. ९९२२४०१०४२ लखन कपोते - ९८६०३०५०९४ यांच्याशी संपर्क साधावा.

पान १ वरून ...

युतीचे 'राज' कायम

संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्यस्तरीय तीन दिवसीय शिबिराला आज सुरुवात झाली. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे या शिबिरात मनसैनिकांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. तत्पूर्वी त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. शिवसेना उबाठा व मनसे युतीला त्यांनी यावेळी बगल देत, आपण इतर मुद्यावर बोलू असे त्यांनी यावेळी नमूद करत युतीबाबत चुप्पी साधली.

यावेळी राज ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळेत सेमी इंग्लिश सुरु केले तर सर्वसामान्य विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. ज्या पालकांना आपल्या पाल्याला इंग्रजी शाळेत शिकवण्याची ऐपत नाही त्या पालकांना याचा निश्चीतच फायदा होईल. कारण एका बाजूला जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडत असतांना या शाळांमध्ये सेमी इंग्लिश सुरू केल्यावर शाळा सुद्धा व्यवस्थित सुरु राहतील.बेरोजगारी वाढत असल्याचे सांगताना राज ठाकरे म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रात खाजगीकरण करून सरकार युवा पिढीचे भवितव्य धोक्यात घालत आहेत. नवनवीन कायदे पारीत करून युवा पिढीसमोर आव्हाने उभी केली जात आहे. इगतपुरीतील या शिबिरामध्ये आगामी निवडणुकांबाबत मनसे पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून राज ठाकरे मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे इगतपुरीत राज ठाकरे कोणती नवी भूमिका घेणार? तसेच निवडणुकांसाठी पदाधिकाऱ्यांना कोणता कार्यक्रम देणार हे उत्सुकता निर्माण करणारे ठरणार आहे. राज ठाकरे यांचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी स्वागत केले. या शिबिराला अमित ठाकरे, बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, अविनाश जाधव,अविनाश अभ्यंकर, सुदाम कोंबडे, ॲड. रतनकुमार इचम यांच्यासह राज्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

'चड्डी-बनियन गँग'वरून विधानसभेत गोंधळ

घेत आदित्य ठाकरे यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेतला. नेमकी चड्डी कोण आणि बनियन कोण, हे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट सांगावे. त्यांना नाव घ्यायला भीती वाटत असेल तर सभागृहात असे शब्द वापरू नयेत. जर हिंमत असेल तर ते शब्द कुणासाठी वापरले आहेत, त्यांचे नाव त्यांनी घ्यावे. नाहीतर ते शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे. बघूया त्यांच्यात किती हिंमत आहे, असे आव्हान राणे यांनी दिले. उद्धव ठाकरे गटाचे आमदार यावेळी आक्रमक होण्याच्या तयारीत असताना भास्कर जाधव यांनी त्यांना शांत बसायची खूण केली. अध्यक्षांनीही आदित्य ठाकरे यांचे शब्द कामकाजातून काढून टाकण्याबाबत कोणताही निर्णय न देता पुढील सदस्याचे बोलण्यासाठी नाव पुकारले. त्यामुळे ठाकरे-राणे यांच्यातील खडाजंगी आपोआप थांबली.

परब यांची उपहासात्मक टीका

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांच्या समाज माध्यमात व्हायरल होत असलेल्या चित्रफितीवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी सोमवारी विधान परिषदेत शिंदे गटाला लक्ष्य केले. जनतेपेक्षा राज्यातील मंत्री सुरक्षित नसून पहिली त्यांची सुरक्षा करा. कारण राज्यात चड्डी-बनियान आणि चड्डी-टॉवेल गँगचे व्हिडिओ फिरत आहेत. मंत्र्यांच्या बेडरुमपर्यंतचे व्हिडिओ बाहेर येत असतील तर मंत्रिमंडळाची किती नाचक्की होत असेल, अशी उपहासात्मक टीका परब यांनी केली. त्यामुळे या व्हिडिओ संदर्भात एसआयटी नेमून तो व्हिडिओ खरा की खोटा आहे हे तपासण्यासाठी फॉरेन्सिक लॅबकडे पाठवा, अशी मागणीही परब यांनी यावेळी केली.आज विधान परिषदेत २८९ अन्वये प्रस्तावावर बोलताना परब यांनी मंत्र्यांच्या व्हिडिओचा मुद्दा मांडला.

राज्यात आयुष उपचारांना पसंती

उभारली जात आहेत. भारतीय जीवनपद्धतीत आयुर्वेदिक उपचार पद्धतीने पुराणकाळापासून उपचार होत आहेत. आयुर्वेदिक उपचाराने रुग्णास गुण येण्यास काहीसा विलंब होत असल्याचा दावा आयुष मंत्रालयाचा असून रुग्णांचा आयुर्वेदिक उपचार घेण्याकडे कल वाढत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आयुर्वेदात रोगाच्या मुळाशी जाऊन आजार कायमचा नष्ट करण्यास प्राधान्य असल्याने पर्यायी उपचार म्हणून एक वर्ग आयुर्वेदिक उपचार घेताना दिसतो. तसेच पंचकर्म करणाऱ्यांची संख्याही वाढत असून, होमिओपॅथी उपचार घेणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. सद्यस्थितीत जिल्हा रुग्णालयांसह इतर रुग्णालयांमध्ये स्वतंत्र कक्ष उभारून आयुष विभागामार्फत रुग्णांवर उपचार केले जात आहेत.

दृष्टिक्षेपात आकडे

बाह्यरुग्ण ४३,२०११

आंतररुग्ण ८२,२८७

उपचार घेतलेले रुग्ण ७,११,१४८

टेलिमेडिसिन ३२,२८९

भाजप प्रवेशाची चर्चा निराधार

जाणार, नाही जाणार हे सगळे तुम्हीच ठरवायला लागले आहात. सूत्राच्या हवाल्याने बातम्या देता आहात. पण यात कोणतेही तथ्य नाही, असे पाटील यांनी सांगितले. मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आजही अध्यक्ष आहे. मी त्या पक्षाचे काम करतोय. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करणारे आम्ही कार्यकर्ते आहोत. व्यक्तिगत पातळीवर भाजपच्या प्रमुख नेत्यांशी माझे चांगले माझे संबंध आहेत. पण कुठल्या नेत्याशी बोललो, मुख्यमंत्र्यांना भेटलो म्हणून त्या पक्षात जाणार असा तर्क लावून बातम्या देण्याची पद्धत चुकीची असल्याचे पाटील म्हणाले.

घोडकेंची माघार; बागुलांचा मार्ग सुकर

त्यांच्या भाजप प्रवेशाचा मार्ग सुकर झाला आहे. विशेष म्हणजे बागुल यांनी अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेला अर्ज स्वेच्छेने मागे घेतल्याने प्रकरणात वेगळाच ट्विस्ट आला आहे. गजू घोडके याने २७ जून रोजी बागुल यांच्याविरोधात व्हिडीओ प्रसारित करुन त्यांच्यावर ईडीने कारवाई करावी, अशी मागणी केली होती. त्यानंतर, ३० जून रोजी रात्री बागूल यांच्यासह नाशिक महानगरप्रमुख मामा राजवाडे व इतर संशयितांनी हा व्हिडीओ 'डिलिट' करण्यासाठी दबाव टाकून मध्यरात्री घरात शिरुन तोडफोड, जबरी चोरी व प्राणघातक हल्ला केल्याची फिर्याद दाखल केली होती. प्राथमिक तपासानुसार भद्रकाली पोलिसांनी काही संशयितांना अटक केली होती, तर सुनील बागूल, मामा राजवाडे, सागर देशमुख यांना अटक करण्याचे प्रयत्न सुरु केले होते. तत्पूर्वीच बागूल यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धावाधाव करुन अर्ज दाखल केला. यानंतर भाजपत पुनर्प्रवेश करण्यासाठी उत्सुक असताना, घोडके याने दाखल केलेल्या गंभीर फिर्यादीमुळे भाजप पक्षश्रेष्ठींनी ऐन मोसमातच इतरांना प्रवेश देत 'बागुल गँग' चा प्रवेश वेटिंगवर टाकला. त्यामुळे बागूल पुरते तणावात आले. न्यायालयाकडून अटकपूर्व मंजूर होताच त्यांचा प्रवेश निश्चित करण्यात आला. मात्र, सुनावणी, तारीख व न्यायाधीश रजेवर असल्याने सुनावणी वारंवार लांबत गेली. त्यातच घोडके याने प्रकरणात थेट नांग्याच टाकून बागुलांविरोधात तक्रारच नसल्याचे 'लेखी' पोलिसांना सादर केले आहे.

बाजार भाव

फळभाज्यांचे प्रती जाळी दर

	किमान	कमाल	सरासरी
टोमॅटो	१५०	३५०	३००
वांगी	७००	९९०	७००
फ्लॉवर	१००	२५०	१५०
कोबी	८०	२५०	१५०
ढोबळी	४००	६००	५५०
कारले	७००	१०००	९००
भेंडी	५००	९००	७००
गाजर	५००	६००	५५०
काकडी	५००	८००	७००

भाजीपाला दर किंचित घसरले

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या मुख्य मार्केट यार्डात भाजीपाल्याची आवक वाढलेली प्रामुख्याने मेथी, कोथिंगिर आवक अधिक आहे. त्यामुळे पालेभाज्यांच्या दरात किंचित घट झालेली आहे. कोथिंगिरीच्या ५६ हजार जुड्यांची आवक होऊन लिलात ती प्रतवारीनुसार १००० ते ४१०० रुपये शेकडा विक्री झाली.

मेथीच्या ४६ हजार जुड्यांची आवक झाली. ही आवक गेल्या आठवड्याच्या तुलनेत सुमारे ८ पटीने वाढलेली आहे. त्यामुळे मेथी १००० ते २००० रुपये शेकडा दराने लिलावात विक्री झाली.

शिवसेना वादावर ३ महिन्यांत निकाल

ठाकरे गट आणि शिंदे गटात सुरु असलेला वाद आता निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. सर्वोच्च न्यायालयात या खटल्याच्या सोमवारी झालेल्या सुनावणीवेळी खंडपीठाने महत्त्वाच्या सूचना दिल्या. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी आजच्या सुनावणीत एक महत्त्वाची टिप्पणी केली. त्यांनी ठाकरे गटाला सांगितले की, आता या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत. तुम्ही त्यामुळे आता नव्याने अर्ज करणे बंद करा. हे प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. आता याप्रकरणाची मुख्य सुनावणी ऑगस्ट महिन्यात घेऊ, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९८,२००
२२ कॅरेट	९०,३४०
चांदी (प्रति किलो)	
११,५०००	

शेअर बाजार

सेन्सेक्स	८२,२५३
	(-२४७)
निफ्टी	२५,०८२
	(-६८)

शब्दकोडे :३०१



आडवे शब्द : १) कृषीवल. ४) समोरासमोर. १०) प्रतिष्ठित. ११) पाण्याचा प्रवाह. १२) हस्तलाघव, जादू. १५) पत्र. १६) महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील हदादीचा व सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेश. १८) गडकरी. २०) चरफड, मनाची घालमेल. २२) गवंडी. २४) अंजनाचा एक प्रकार. २५) फुरसत. २६) गाय. २७) आश्चर्याची गोष्ट. २९) कावळ्याचे ओरडणे. ३१) गव्हाचे जाडसर पीठ. ३३) सोन्याचांदीचा व्यापारी. ३४) बुद्धीची वाढ न झालेला. ३५) लाकूड कापण्याचे हत्यार. ३६) उष्णता, उष्ण वाफ. ३७) झाकणाचे पात्र. ३९) मानाचे चिन्ह, बिल्ला. ४०) डुक्कर. ४३) अर्थसंकल्प. ४५) पांढरपेशा, नोकरी करणारा. ४८) जर च्या बरोबरचा शब्द. ४९) जाजम. ५१) पुरुष. ५२) गरजू. ५३) पूर्णपणे (खोटे), ५५) पर्जन्यकाळ. ५६) मेंढपाळ. ५८) फुलांची टोपली. ६१) अटीची भाषा. ६२) एक पालेभाजी. ६३) श्रीकृष्णाचे एक नांव.

उभे शब्द : १) शेपटी. २) कमीत कमी व जास्तीत जास्त. ३) पद्धत. ४) नोदल. ५) चीन व भारतामधील एक छोटे राष्ट्र. ६) आंब्याची पोळी. ७) प्रेम. ८) नृत्य. ९) मैत्रीण. १३) तळे, तलाव. १४) लाजणारा. १७) शरीर. १९) प्रमाण पत्र. २०) तात्काळ. २१) मळलेला. २३) प्रचंड. २४) सुधारणावादी. २८) वर-वधूची मिरवणूक. ३०) उलटी, ओकारी. ३२) उत्तराधिकारी. ३३) धडा, शिक्षण (हिं). ३६) पाणी. ३८) दारु, गुत्ता. ३९) वार्ताहर. ४१) बोलणे, जीभ. ४२) हवाई अड्डा. ४३) वर-वधू मधील पडदा. ४४) सदोदित. ४६) कप्तान. ४७) पाणी. ५२) घसा. ५५) शर्करा. ५६) हिंमत. ५७) तृण. ५८) पंख. ५९) कुबड. ६०) सावली.

शब्दकोड३००चे उत्तर